शिक्षण विभाग
जिल्हा परिषद बीड
फॅक्स क्र. 02442/222205 Email- mdmbeed@gmail.com

जाक्र.जिपबी/शिविप्रा/मावि-3/कावि/ /2018 दिनांक- /11/2018.

प्रसिध्दीपत्रक 15 NOV 2018

बीड जिल्हा परिषदे अंतर्गत सन 2014-2015 मध्ये तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी व तत्कालिन विभाग प्रमुख यांचे विरुध्द विविध तक्रारी, मा. विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे कडे करण्यात आल्या. त्या अनुषंगाने मा. अपर आयुक्त तथा अध्यक्ष, श्री.जितेंद्र पापळकर चौकशी समिती, विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद. यांचे चौकशी पथकाने दिनांक 24/09/2014 रोजी जिल्हा परिषद बीड येथे आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांची व वस्तीशाळा शिक्षक यांना निमशिक्षक म्हणुन पदस्थापना दिले बाबतची चौकशी करुन चौकशी अहवाल शासनास सादर केला. त्या अनुषंगाने शासनाकडुन पत्र क्र.एसएसएन/2015 संक्र-9/2015/टिएनटी-2 दि.23/04/2015 रोजी प्राप्त झाले ज्याव्दारे त्यांनी जिल्हा परिषद बीड येथील शिक्षकांची नियुक्ती करतांना झालेल्या अनियमितते संदर्भात खालील कार्यवाही करणेबाबत आदेशीत करण्यात आले.

- **आंतर जिल्हा बदलीने बीड जिल्हा परिषद येथे रुजू झालेल्या सर्व शिक्षकांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे आणि त्यांच्या सेवा मुळ जिल्हयातील आस्थापनेवर प्रत्यार्पित करण्यात याव्यात.**
- **बीड जिल्हा परिषदेत नियुक्त करण्यात आलेल्या सर्व वस्तीशाळा शिक्षकांच्या नियुक्त्या तात्काळ रद्द करण्यात याव्यात.**

उपरोक्त 23/04/2015 मधील आदेशाविरुध्द विविध शिक्षकांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे 8098/2015 व इतर 19 याचिका दाखल करुन दाद मागितली. त्यावर दिनांक 03/08/2015 रोजी मा. न्यायालयाने आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना शासनाकडून मंजूर पदाबाबत निश्चिती होईपर्यंत आहे त्या ठिकाणी कार्यरत ठेवण्याचे निर्देश दिले तसेच प्रवर्गाबाबत माहिती घ्यावी व सदर शिक्षकांना नोटीसा बजावून, पुरेशी संधी देवून त्यांचे म्हणणे विचारात घेवून निर्णय घ्यावा असे आदेशीत केले.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक एसएसएन-2015/(प्र.क्र.9/15)/टिएनटी-2 दिनांक 27/11/2015 चे शासन निर्णयानुसार दिनांक 28/08/2015 च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या संचमान्यतेनुसार एकूण 793 वाढीव पायाभूत पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे. ती वाढीव पायाभूत पदे खालील अटी / शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे.

- दिनांक 01 मार्च 2014 च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार वस्तीशाळा स्वंयसेवक / निमसेवक यांची नियुक्ती जिल्हा परिषदेवर करण्यात यावी.
- आंतर जिल्हा बदलीने जि.प.बीड यांच्याकडे आलेल्या शिक्षकांना ग्रामविकास विभागाच्या प्रचलित धोरणानुसार (मंजूर रिक्त पदावर) पदस्थापना देण्यात यावी.
- उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करताना आरक्षण धोरणाचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल याची काळजी घेण्यात यावी. **बिंदूनामावलीप्रमाणे पदस्थापना देणे शक्य नसल्यास अशा व्यक्तींच्या सेवा त्यांच्या मुळ जिल्हयात प्रत्यावर्तीत करण्यात याव्यात.**

- **आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना बदलीन पदस्थापना देताना प्रचलित धोरणाचे पालन करावे. तरीसुध्दा मंजूर पदे कमी पडत असल्यास आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांच्या सेवा मुळ जिल्हयात तात्काळ प्रत्यावर्तीत करण्यात याव्यात.**
- सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उर्वरित रिक्त पदे प्रचलित धोरणानुसार भरण्याबाबत कारवाई करण्यात यावी.

जिल्हा परिषद बीड अंतर्गत आंतर जिल्हा बदलीने आलेल्या व दिनांक 29/11/2016 रोजी मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, औरंगाबाद यांचेकडून प्रमाणित करुन घेण्यात आलेल्या बिंदूनामावलीनुसार जिल्हा परिषद बीड मध्ये **खुला, भजक, भजड व विजाअ** प्रवर्गात अतिरिक्त झालेल्या सहशिक्षक यांची यादी जि.प.बीड अंतर्गत गटशिक्षणाधिकारी (सर्व) यांना या कार्यालयाचे पत्र क्र.शिविप्रा/मावि-3/कावि/277/17 दि.16/01/2017 अन्वये पुरवून संबंधित शिक्षक यांचे यादीबाबतचे आक्षेप सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले.

प्राथमिक स्वरुपामध्ये प्रसिध्द केलेल्या 886 शिक्षकांच्या यादीतील शिक्षकांची तपासणी करुन मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांना या कार्यालयाचे पत्र क्र. शिवि/मावि-3/कावि/00523 दि. 17/02/2017 अन्वये आंतर जिल्हा बदलीने बीड जिल्हा परिषदेत रुजू झालेल्या शिक्षकांपैकी, दिनांक 29/11/2016 रोजी मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, औरंगाबाद यांनी प्रमाणित केलेल्या बिंदूनामावलीनुसार अतिरिक्त झालेल्या एकूण 342 सहशिक्षकांची सेवा त्यांच्या मुळ जिल्हयात किंवा इतर जिल्हयात प्रत्यार्पित करण्याबाबत कार्यवाही त्यांचे स्तरावरुन व्हावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

दिनांक 02/02/2018 रोजी त्रुटी पूर्ततेसाठी मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष यांना सादर करण्यात आलेल्या बिंदूनामावलीला. दिनांक 23/08/2018 रोजी प्रमाणित करण्यात आले आहे

मा.अवर सचिव, ग्रामविकास विभाग यांचे पत्र क्र.जिपब-4818/प्रक्र170/आस्था-14 दि.08/08/2018 नुसार शासनाने बिंदुनामावली नुसार अतिरिक्त झालेल्या आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना त्यांचे मुळ जिल्हयात पाठविण्यात यावे असे आदेशीत केले आहे.

आंतर जिल्हा बदलीने बीड जिल्हा परिषदेमध्ये सामावून घेतलेल्या शिक्षकांमुळे इतर प्रवर्गातील शिक्षक अतिरिक्त झाल्याने व मागासवर्गीय प्रवर्गातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय शिक्षकांचा अनुशेष शिल्लक असल्याने मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्रमांक 52/2017 दाखल झाली, या न्यायालयीन प्रकरणाबाबत चर्चा करण्यासाठी मा. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 14/08/2018 रोजी त्यांचे समिती कक्ष, मंत्रालय मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे सुचना देण्यात आलेल्या आहेत.

- शिक्षणाधिकारी (प्रा), जि.प.बीड यांनी बीड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाची अद्यावत बिंदूनामावली सर्व त्रुटींची पूर्तता करुन दिनांक 20 ऑगस्ट, 2018 पूर्वी मागासवर्गीय कक्षाकडून प्रमाणित करुन घ्यावी.
- आंतरजिल्हा बदलीमुळे बीड जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळांमध्ये बदली होवून आलेल्या व सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, औरंगाबाद यांनी दिनांक 29/11/2016 रोजी मंजूर केलेल्या बिंदूनामावलीनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या सर्व शिक्षकांना ज्या-त्या जिल्हा परिषदेमध्ये प्रत्यावर्तीत करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी तात्काळ निर्गमित करावेत, सदरचे

प्रत्यावर्तन करताना सर्वात सेवाकनिष्ठ शिक्षकांचे प्रथम प्रत्यावर्तन अशा रितीने प्रत्यावर्तनाची कार्यवाही करावी.

- उपरोक्त प्रत्यावर्तनामुळे काही विशिष्ट शाळांमध्ये मोठया प्रमाणावर शिक्षकांचे प्रत्यावर्तन होत असल्यास शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेवून आवश्यक ते शिक्षक स्थानिक पातळीवर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.
- दिनांक 20 ऑगस्ट, 2018 पर्यत मंजूर करुन घेण्यात येणाऱ्या बिंदूनामावलीमुळे आणखी काही शिक्षक अतिरिक्त होत असल्यास त्यांचेही तात्काळ त्या-त्या जिल्हा परिषदांमध्ये प्रत्यावर्तन करण्याची कार्यवाही शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी तात्काळ करावी.
- जिल्हा परिषदांतर्गत मंजूर बिंदूनामावली व्यतिरिक्त शिक्षकांची अतिरिक्त पदे भरली जाणार नाहीत, याची दक्षता शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी घ्यावी.

प्राथमिक स्वरुपामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीवरील आक्षेपांच्या अनुषंगाने आंतरजिल्हा बदली अतिरिक्त शिक्षकांची अंतिम यादी प्रसिध्द करणे आवश्यक होते.

दरम्यानच्या काळात जनहित याचिका 52/2017 अन्वये मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक 04/09/2018 च्या निर्णयानुसार प्रत्यावर्तनाची कार्यवाही जलदगतीने करुन संबंधित शिक्षकांच्या बाबतीत बिंदूनामावली आरक्षण धोरणाचे उल्लघंन होणार नाही अशा पध्दतीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार अतिरिक्त (302) शिक्षकांची अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सोबत : यादी.

**अमोल येडगे (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद, बीड

**प्रतिलिपी :**

1) शिक्षणाधिकारी (प्रा), यांना देवून कळविण्यात येते की, सदरील यादी जि.प. च्या सूचनाफलकावर प्रसिध्द करावी.
2) तहसिलदार, ता.------------(सर्व), जि.बीड यांना देवून कळविण्यात येते की, सदरील यादी आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करणे व त्याबाबतचा अहवाल पाठवावा.
3) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, -------- (सर्व), जि.बीड यांना देवून कळविण्यात येते की, सदरील यादी आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करणे व त्याबाबतचा अहवाल पाठवावा.
4) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती ------------ (सर्व), जि.बीड सदरील यादी संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावी.
5) प्रत प्रसिध्दीसाठी (जि.प.चे अधिकृत संकेतस्थळ : WWW.zpbeed.gov.in)

**अमोल येडगे (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद, बीड